पिंपरी चिंचवड महानगरपालिका
माहिती व तंत्रज्ञान विभाग
क्र.- मातंवि/१३/कावि/१६/२०१६
दिनांक.१३/०१/२०१६

**परिपत्रक**

**विषय – मनपा संकेतस्थळावरील माहिती अद्ययावत ठेवणेबाबत..**

पिंपरी चिंचवड महानगरापलिकेची वेबसाइट **www.pcmcindia.gov.in** या नावाने कार्यान्वित असुन सदर वेबसाईटवर महापालिकेच्या विविध विभागांशी संबंधित माहिती (उदा.परिपत्रके, आदेश, निविदा, कोटेशन,विविध योजना तसेच नागरिकांना देण्यात येणा-या सेवा, RTI अंतर्गत प्रसिध्द करावयाची माहिती इ.) वेळोवेळी प्रसिध्द करणेत येते. तथापि माझे असे निदर्शनास आले आहे की, संकेतस्थळावर सुविधा उपलब्ध असतांना देखील विभागाने निर्गमित केलेली परिपत्रके व वेळोवेळी काढण्यात आलेले आदेश वेबसाईटवर प्रसिध्द केले जात नाहीत. तरी सर्व विभाग प्रमुखांना कळविणेत येते की,आपले विभागाशी संबंधित परिपत्रके व आदेश वेळचेवेळी संकेतस्थळावर प्रसिध्द करणेची दक्षता घ्यावी.

तसेच प्रत्येक विभागास त्यांच्या विभागासंबंधित माहिती (उदा.परिपत्रके, आदेश व इतर माहिती) वेबसाईटवर प्रसिध्द करणे व ती वेळोवेळी अद्ययावत करण्याचे अधिकार देणेत आलेले आहेत. त्यानुसार सर्व विभागांनी वेबसाईटवरील आपले विभागाशी संबंधित माहिती वेळोवेळी अपडेट करण्याची दक्षता घ्यावी. विहित मुदतीत संबंधित माहिती प्रसिद्ध झाली नाही तर त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत विभागाची राहील याची नोंद घेणेत यावी.

विभाग प्रमुखांनी सदरचे परिपत्रक सर्व अधिकारी/कर्मचारी यांचे निदर्शनास आणुन द्यावे.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११०१८.